मुंबई विकास--
नागरीक मंच गठित करण्याबाबत.

**महाराष्ट्र शासन,**
**सामान्य प्रशासन विभाग,**
**शासन निर्णय क्रमांक : मुंबई विकास-२००४/प्र.क्र.१२/२००४/विशेष प्रकल्प,**
**मंत्रालय,मुंबई-४०० ०३२.**
**दिनांक : १७ जुलै,२००४.**

**प्रस्तावना :-**

मुंबई विकासाची पुढील दहा वर्षासाठी दिशा ठरविणे व मुंबईस एक आंतरराष्ट्रीय शहर बनविणे या दृष्टीने मा.मुख्यमंत्री यांनी मुख्य सचिवांच्या अध्यंक्षतेखाली एका टास्क फोर्सची स्थापना केली होती. सदर टास्क फोर्सने आपल्या शिफारशी मा.मुख्यमंत्र्यांच्या समोर फेब्रुवारी,२००४ मध्ये मांडल्या असता मा.मुख्यमंत्री यांनी शहरातील प्रतिष्ठित नागरीकांनाही मुंबई विकासात सहभागी करुन घेण्याची सूचना केली.

**शासन निर्णय :-**

मुंबई विकासासाठी गठित करण्यात आलेल्या टास्कफोर्सने शहरातील पतिष्ठित नागरीकांना सहभागी करुन घेण्याविषयी केलेल्या शिफारसी लक्षात घेता प्रतिष्ठित नागरीकांच्या एका कृतीमंचाची स्थापना करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती. त्यानुसार मुंबई विकासाकरिता खालील प्रतिष्ठित नागरीकांचा कृतीमंच स्थापन करण्यास शासन मान्यता देत आहे. नागरीक कृती मंच यथावकाश आपल्या कार्यासाठी आवश्यक वाटल्यास योग्य नियमावली तयार करेल.

| | | | |
|---|---|---|---|
| १ | डॉ.आर.चिदंबरम | १६ | श्रीमती विजया मेहता |
| २ | श्री. बी.जी.देशमुख | १७ | श्री.इक्बाल छागला |
| ३ | श्री.गर्सन डाकुन्हा | १८ | श्री.श्याम बेनेगल |
| ४ | श्री.नाना चुडासामा | १९ | श्री.अजित वाडेकर |
| ५ | डॉ.शरयू व्ही.दोशी | २० | प्रो.इंदू सहानी |
| ६ | श्री.आनंद महिन्द्रा | २१ | श्री.एम.एस.बंगा |
| ७ | श्री.नानिक रुपानी | २२ | श्री.एच.एन.सेठना |
| ८ | श्री.दिपक पारेख | २३ | श्रीमती ललिता गुप्ते |
| ९ | श्री.जमशेद गोदरेज | २४ | श्री.सुभाष दांडेकर |
| १० | श्री.एफ.टी.खोराकीवाला | २५ | श्रीमती शारदा द्वीवेदी |
| ११ | श्री.अॅलेक् पद्मसी | २६ | श्री.आर.ए.जहागिरदार |
| १२ | श्री.मिनू श्रॉफ | २७ | श्री.कुमार केतकर |
| १३ | प्रो.रुपा शहा | २८ | श्री.रणजित पंडीत |
| १४ | श्री.नवल टाटा | २९ | श्री.ए.जोकीम |
| १५ | श्री.नरींदर नायर | ३० | श्री.राज श्रॉफ |

(कृ.मा.प.)

**<u>नागरीक कृती मंचाची कार्यकक्षा</u> :-**

१. टास्क फोर्सने केलेल्या शिफारशीच्या अंमलबजावणीचा पाठपुरावा करणे.

२. यासाठी तीन महिन्यातून एकदा मा.मुख्यमंत्री यांच्या उपस्थितीत आयोजलेल्या बैठकीस उपस्थित रहाणे.

३. शहरासाठी खाजगी गुंतवणूक आकृष्ट करणे.

४. मुंबईस्थित मोठया उदयोजकाकडून शहराच्या सुशोभिकरण व सौंदर्यीकरणासाठी निधी प्राप्त करुन घेणे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

**(संजय उबाळे)**
**सचिव(विशेष प्रकल्प)**

प्रत,

१. मा.राज्यपालांचे सचिव,
२. मा.मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव,
३. मा.उप मुख्यमंत्री यांचे सचिव,
४. सर्व मंत्री / राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव / स्वीय सहाय्यक,
५. मा.मुख्य सचिव,
६. सर्व अपर मुख्य सचिव / प्रधान सचिव / सचिव,
७. सामान्य प्रशासन विभागातील सर्व कार्यासने,
८. सर्व संबंधित प्रतिष्ठित नागरीक (नावाने)
९. निवड नस्ती / विशेष प्रकल्प.